**रे.दि.मु.क्र. १४१/२०२३ मधील निशाणी क्र. २३ खालील आदेश**

प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांची लेखी कैफियत व म्हणणे दाखल करणेकामी झालेला विलंब माफ करून त्यांची लेखी कैफियत व म्हणणे अभिलेखावर स्वीकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागील बाजूसच त्याचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादींविरुद्ध प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जाकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी हे सदर दाव्याकामी मे. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वकीलपत्र दाखल करून हजर झाले आहेत. परंतु सदर कामातील आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळू न शकल्याने सदर कामी वेळेत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. सदर कैफियत व म्हणणे दाखल करण्यास प्रस्तुत प्रतिवादींना विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून केलेला नाही. प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत व म्हणणे दाखल करून घेतल्यास न्यायनिर्णय देण्यास सुलभता येणार आहे. तसेच वादीचे काहीही नुकसान होणार नाही. प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत व म्हणणे अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे कधीही व कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादींविरुद्ध झालेला कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी व प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे.

३) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास असे प्रतिकथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील मजकूर वादीला मान्य व कबूल नाही. प्रस्तुत अर्जातील कारण योग्य व संयुक्तिक नाही. वादीने दावा मिळकतीसंदर्भात आवश्यक ती संपूर्ण कागदपत्रे दावेसोबत जोडली आहेत. वादीचे चुकीचे कारण नमूद करून अर्ज दिल्याने तो चालण्यास पात्र नाही. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज मोघमपणे दिला असून किती दिवसांचा विलंब झाला आहे हे नमूद केले

नाही व त्या विलंबाचे आनुषंगाने पुरावा दिला नाही. या कारणास्तव वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह रद्द करावा. यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास रक्कम रू. ५०००/– कॉस्ट करण्यात यावा व तो वादीला द्यावा.

४) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मागणीकरिता, जाहीरनामेकरिता आणि निरंतर व हुकमी ताकिदीकरिता दाखल करण्यात आलेला आहे. दावा उभय पक्षकारांच्या स्थावर मिळकतीतील हक्क व हितसंबंधाबाबतचा आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेली कारणे ही सारासार बुद्धीच्या आधारे विचारात घेण्यासारखी आहेत. तसेच उभय पक्षकारांमधील वाद विषयाचे स्वरूप विचारात घेतले असता वाद विषयाचे अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारे प्रस्तुत प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत निर्माण होऊन प्रकरणांची अनेकता देखील होण्याची शक्यता आहे. सबब, प्रस्तुत प्रतिवादींना अर्जासोबत विलंबाने दाखल केलेली कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुत प्रतिवादींना दावा समन्सची बजावणी दि. २६/०४/२०२३ रोजी झाल्यानंतर ते दिनांक २७/०४/२०२३ रोजी त्यांचे वकीलामार्फत दाव्यात हजर झालेले आहेत. त्यानंतर त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा आज दिनांक १०/०८/२०२३ रोजी दाखल केला आहे. प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रतिवादींना जरी कैफियत व म्हणणे दाखल करणेसाठी विलंब झाला असला तरी त्यांचेविरुद्ध अद्याप विना कैफियतीचा व विना म्हणणेचा आदेश पारित करण्यात आलेला नाही. अशाप्रकारे त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी झालेल्या अल्पशः विलंबाच्या कालावधीचा सारासार विचार करता वाद विषयाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारेही

प्रस्तुत प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रकरणातील सर्व परिस्थितीचा व वरील सर्व कारणांचा विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला खर्चाची एकूण रक्कम रुपये ५०/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला खर्चाची एकूण रक्कम रू. ५०/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादींनी वादीला वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना त्यांची लेखी कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्यांनी या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावी.

EKNATH KOYAPPA CHOUGALE

Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2023.08.16 11:53:01 +0530

स्थळ:– जत (एकनाथ को. चौगले)

दिनांकः १०/०८/२०२३ (JO Code -MHSN2400)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १०/०८/२०२३ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १०/०८/२०२३ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १६/०८/२०२३ |